• वर्ष : ०३ • अंक : ३०५ • पुणे • सोमवार, दि. २७ जुलै २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313


दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com


1,22,570

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

पुण्यातील लोकप्रिय दैनिक





# नव्या पिढीची आधुनिक दृष्टी

## मा. श्री. सिद्धार्थदादा भोकरे

दूरदृष्टी असली की ध्येय निश्चित होते... ध्येयाला परिश्रमांची जोड मिळाली की यशाचा मार्ग खुला होतो... आणि त्या यशाला सामाजिक बांधिलकीची किनार लाभली की एक प्रेरणादायी नेतृत्व घडते. अशाच दूरदृष्टीपूर्ण, कर्तृत्ववान आणि युवा नेतृत्वाचे नाव म्हणजे मा. श्री. सिद्धार्थदादा भोकरे.

शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तेचा ध्यास, युवकांच्या उज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्न, समाजाशी असलेली बांधिलकी, क्रीडा क्षेत्रातून आत्मसात केलेली शिस्त आणि संघभावना तसेच संघटनात्मक कार्यातील प्रभावी नेतृत्व या सर्व गुणांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पाहायला मिळतो.

श्री अंबाबाई तालीम संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळताना त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीला आधुनिकतेची जोड देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष म्हणून डिजिटल माध्यम क्षेत्रातील प्रतिनिधींना संघटित करण्यासाठी ते कार्यरत आहेत. राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेत उपकर्णधार म्हणूनही त्यांनी





(दै. आरंभ पर्व)

**शिक्षण, समाजसेवा, क्रीडा आणि संघटनात्मक क्षेत्रात कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे मा. श्री. सिद्धार्थदादा भोकरे श्री अंबाबाई तालीम संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. सिद्धार्थदादा भोकरे यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!**

संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे अध्यक्ष मा. श्री. संजय भोकरे यांचे सुपुत्र असलेल्या सिद्धार्थदादा भोकरे यांना शिक्षण, समाजसेवा आणि संस्थात्मक कार्याचा समृद्ध वारसा लाभला आहे.

मात्र केवळ वारशावर विसंबून न राहता स्वतःच्या कर्तृत्वातून स्वतंत्र ओळख निर्माण करणे हीच खऱ्या नेतृत्वाची कसोटी असते. सिद्धार्थदादा भोकरे यांनी ही कसोटी समर्थपणे पेलत शिक्षण, समाजकारण, क्रीडा, संघटन आणि डिजिटल माध्यम अशा विविध क्षेत्रांत स्वतःच्या कार्याचा ठसा उमटविला आहे.

वडिलांच्या अनुभवसंपन्न मार्गदर्शनासोबत नव्या पिढीची आधुनिक दृष्टी, तंत्रज्ञानाची जाण आणि भविष्याचा वेध घेण्याची क्षमता यांची सांगड घालत संस्थेच्या प्रगतीसाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.

**गुणवत्तापूर्ण शिक्षणातून हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचा संकल्प**

शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविण्याचे साधन नाही. शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, आत्मविश्वास, कौशल्य, संस्कार आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची क्षमता निर्माण झाली पाहिजे. हाच विचार केंद्रस्थानी ठेवून श्री अंबाबाई तालीम संस्था आणि संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसची वाटचाल सुरू आहे.

अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, फार्मसी, नर्सिंग, एमबीए, आयएफएम, डी.एड. तसेच शालेय शिक्षण अशा विविध शैक्षणिक शाखांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी संस्था कार्यरत आहे.

विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, आधुनिक अध्यापन पद्धती, संशोधन, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि आधुनिक पायाभूत सुविधांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बदलत्या जगासाठी सक्षम करण्यावर भर देण्यात येत आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या हातात केवळ प्रमाणपत्र नसावे, तर त्यांच्या हातात ज्ञान, कौशल्य आणि रोजगाराच्या संधीही असाव्यात, या भूमिकेतून प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण यश म्हणजे अभियांत्रिकी महाविद्यालयाला प्राप्त झालेला स्वायत्त दर्जा. हा दर्जा संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची आणि भविष्याभिमुख वाटचालीची महत्त्वाची पावती ठरला आहे. त्याचबरोबर संस्थेने NAAC कडून 'A' श्रेणी प्राप्त करून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा नवा मानदंड निर्माण केला आहे.

या यशामागे संस्थेचे व्यवस्थापन, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक या सर्वांचे योगदान आहे. या सर्व घटकांना एका ध्येयाने जोडून गुणवत्तेच्या दिशेने संस्थेची वाटचाल अधिक गतिमान करण्यामध्ये सिद्धार्थदादा भोकरे यांच्या नेतृत्वाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही घेण्यात आली आहे.

भारतीय तंत्रशिक्षण संस्था (ISTE), नवी दिल्ली यांच्या वतीने संस्थेला प्रतिष्ठेचा "Emerging Integrated Campus Award" प्रदान करण्यात आला. शैक्षणिक गुणवत्ता आणि सर्वांगीण विकासाच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांची ही गौरवशाली पावती ठरली.

याचबरोबर संयुक्त अरब अमिरातीतील अबूधाबी येथे संस्थेला "Business Titans – Excellence in Education Award" मिळाल्याने संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला.

स्थानिक पातळीपासून सुरू झालेली शैक्षणिक वाटचाल राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर सन्मानित होणे ही संपूर्ण संस्था परिवारासाठी अभिमानाची बाब आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात पदवीसोबत व्यावहारिक ज्ञान, तंत्रज्ञानाची जाण आणि उद्योगांना आवश्यक कौशल्ये असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाशी जोडणे, प्रशिक्षण देणे आणि रोजगारक्षम बनविणे यावर विशेष भर दिला जात आहे.

हजारो विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, कौशल्य विकास, प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा पाया मजबूत करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांमध्ये सिद्धार्थदादा भोकरे यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

विद्यार्थ्याने संस्थेत प्रवेश घेतल्यापासून ते यशस्वी करिअरच्या दिशेने वाटचाल करेपर्यंत त्याला योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळाव्यात, ही विद्यार्थीहिताची भूमिका त्यांच्या कार्यामध्ये दिसून येते.

**फुटबॉलच्या मैदानावरही नेतृत्वाचा ठसा**

शिक्षण आणि समाजसेवेबरोबरच क्रीडा क्षेत्रातही सिद्धार्थदादा भोकरे यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेत उपकर्णधार म्हणून जबाबदारी सांभाळताना त्यांनी राज्याचे प्रतिनिधित्व केले. क्रीडा क्षेत्रातून मिळणारी शिस्त, संघभावना, कठोर परिश्रम, वेळेचे नियोजन, विजयासाठी संघर्ष करण्याची वृत्ती आणि पराभवानंतर पुन्हा उभे राहण्याची ताकद त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग बनली आहे.

क्रीडांगणावर संघातील प्रत्येक खेळाडूला सोबत घेऊन पुढे जाण्याची आवश्यकता असते. हाच संघभावनेचा संस्कार त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक नेतृत्वातही प्रकर्षाने दिसून येतो.

**सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्राशी जिव्हाळ्याचे नाते**

सिद्धार्थदादा भोकरे यांच्या कार्याचा परीघ केवळ शैक्षणिक संस्थांपुरता मर्यादित राहिलेला नाही. सामाजिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक उपक्रमांमध्येही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

युवकांना सकारात्मक कार्यासाठी प्रोत्साहित करणे, सामाजिक उपक्रमांना बळ देणे, विविध क्षेत्रांतील व्यक्ती आणि संस्थांना एका व्यासपीठावर आणणे तसेच समाजोपयोगी कार्यासाठी संस्थात्मक ताकद उभी करणे



यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

समाजाच्या विकासात शैक्षणिक संस्थांनी सक्रिय भूमिका बजावली पाहिजे, या विचारातून शिक्षण आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ करण्यावर त्यांचा भर आहे.

**दिग्गजांच्या शुभेच्छा आणि सदिच्छांचा लाभ**

सार्वजनिक जीवनातील सक्रिय सहभागामुळे सिद्धार्थदादा भोकरे यांचा विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी स्नेहपूर्ण संवाद झाला आहे.

विविध प्रसंगी मा. शरद पवार, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मा. उद्धव ठाकरे, मा. चंद्रकांत पाटील आणि मा. उदय सामंत यांसारख्या ज्येष्ठ राजकीय नेत्यांच्या शुभेच्छा, सदिच्छा आणि मार्गदर्शनाचा लाभ त्यांना झाला आहे.

कला आणि चित्रपट क्षेत्रातील सलमान खान, अजय-अतुल, स्वप्नील जोशी, चंकी पांडे, सोनाली कुलकर्णी यांसारख्या नामवंत व्यक्तींशीही विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांचा स्नेहपूर्ण संवाद झाला आहे.

विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी निर्माण झालेला हा संवाद त्यांच्या व्यापक सामाजिक संपर्काची ओळख करून देतो.

**आधुनिक शिक्षणाच्या नव्या पर्वाकडे वाटचाल**

आज जग झपाट्याने बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, अत्याधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, नवोपक्रम, उद्योगाभिमुख कौशल्ये आणि जागतिक रोजगाराच्या संधी यामुळे शिक्षणाचे स्वरूपही बदलत आहे.

या बदलांचा वेध घेऊन विद्यार्थ्यांना भविष्यकालीन आव्हानांसाठी सक्षम करण्याची आवश्यकता आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणात अधिकाधिक वापर, संशोधनाला चालना, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील समन्वय, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि जागतिक स्तरावरील संधी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने संस्था पुढे जात आहे.

आधुनिकतेचा स्वीकार करताना संस्कार, शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि गुणवत्तेशी कोणतीही तडजोड होऊ नये, ही भूमिका संस्थेच्या वाटचालीला अधिक सक्षम करते.

**युवा पिढीसमोर कर्तृत्वाचा आदर्श**

आजच्या युवकांसाठी सिद्धार्थदादा भोकरे यांचा प्रवास अनेक अर्थांनी प्रेरणादायी आहे.

शिक्षण क्षेत्रातील व्यवस्थापन असो, सामाजिक उपक्रम असोत, डिजिटल माध्यमांचे संघटन असो किंवा फुटबॉलचे मैदान असो प्रत्येक क्षेत्रात जबाबदारी स्वीकारून स्वतःला सिद्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो.



युवकांनी केवळ यशाचे स्वप्न पाहू नये, तर त्या स्वप्नासाठी कठोर मेहनत करावी. आपल्या यशासोबत समाजाच्या प्रगतीचाही विचार करावा आणि मिळालेल्या संधींचा उपयोग इतरांसाठी नवी संधी निर्माण करण्यासाठी करावा, हा संदेश त्यांच्या कार्यातून अधोरेखित होतो.

नेतृत्व म्हणजे पद नव्हे, तर जबाबदारी!

खरे नेतृत्व पदामुळे निर्माण होत नाही. आपल्या कार्यामुळे लोकांचा विश्वास संपादन करणे, योग्य वेळी योग्य निर्णय घेणे, सहकाऱ्यांना सोबत घेणे आणि सामूहिक ध्येयासाठी सातत्याने कार्यरत राहणे यातून नेतृत्व घडते.

सिद्धार्थदादा भोकरे यांच्या कार्यशैलीतही हीच भूमिका दिसून येते.

शैक्षणिक संस्थेतील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि व्यवस्थापन यांना एका समान ध्येयाने जोडत संस्थेच्या प्रगतीचा वेग कायम राखण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

संस्था मोठी करण्यापेक्षा संस्थेतील प्रत्येक विद्यार्थ्याचे भविष्य मोठे करणे अधिक महत्त्वाचे आहे, या विचारातूनच त्यांच्या कार्याची दिशा स्पष्ट होते.

ध्येय मोठे... संकल्प भक्कम... वाटचाल यशाकडे!

सिद्धार्थदादा भोकरे यांच्या आजवरच्या कार्याचा आढावा घेतला असता त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील चार प्रमुख पैलू प्रकर्षाने समोर येतात—शिक्षणाची दूरदृष्टी, समाजसेवेची बांधिलकी, क्रीडा क्षेत्रातील शिस्त आणि संघटनात्मक नेतृत्व.

या चारही क्षेत्रांचा समन्वय साधत त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाखाली शैक्षणिक संस्थांनी आणखी मोठी भरारी घ्यावी, विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अधिकाधिक संधी निर्माण व्हाव्यात, संशोधन आणि नवोपक्रमाचे नवे केंद्र विकसित व्हावे आणि समाजसेवेचे कार्य अधिक व्यापक व्हावे, अशी अपेक्षा आहे.

**वाढदिवस विशेष**

**"विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचा संकल्प...**
**गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास...**
**युवकांना सक्षम करण्याची दूरदृष्टी...**
**समाजविकासासाठी अखंड समर्पण...**
**आणि प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्टतेचा निरंतर शोध!"**
**हीच मा. श्री. सिद्धार्थदादा भोकरे यांच्या**
**कर्तृत्ववान वाटचालीची खरी ओळख!**

शिक्षण, समाजसेवा, क्रीडा आणि संघटनात्मक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा वेगळा ठसा उमटविणारे, युवा पिढीला नवी दिशा आणि प्रेरणा देणारे श्री अंबाबाई तालीम संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. सिद्धार्थदादा भोकरे यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

त्यांच्या सर्व संकल्पांना यश लाभो, त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत करावीत आणि त्यांच्या हातून शिक्षण व समाजसेवेचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात घडत राहावे.

त्यांना उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी, यश, कीर्ती आणि दीर्घायुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

मा. श्री. सिद्धार्थदादा भोकरे आपणांस वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

### डिजिटल माध्यमांना संघटनात्मक बळ

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल माध्यमांचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. समाजातील प्रश्न, विकासकामे, सकारात्मक उपक्रम आणि जनहिताचे विषय वेगाने लोकांपर्यंत पोहोचविण्याची ताकद डिजिटल माध्यमांमध्ये आहे. महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष म्हणून सिद्धार्थदादा भोकरे यांनी राज्यभरातील पत्रकार, डिजिटल माध्यमांचे प्रतिनिधी आणि विविध सामाजिक संस्थांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. डिजिटल माध्यम क्षेत्रातील प्रतिनिधींमध्ये समन्वय वाढविणे, त्यांच्या प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि समाजहिताच्या विषयांना प्रभावीपणे जनतेसमोर आणणे यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे. माध्यम क्षेत्रात वेगासोबत विश्वासार्हता आणि सामाजिक जबाबदारीही महत्त्वाची आहे, या भूमिकेतून त्यांचे संघटनात्मक कार्य सुरू आहे.



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. २७ जुलै २०२६





## थोडक्यात पण महत्वाचे



## एलपीजी सिलिंडरसाठी चार तासांत एक्सप्रेस डिलिव्हरी

पुणे (आरंभ पर्व) : इंडियनऑइलने 10 किलोच्या 'इंडेन एक्स्ट्रालाइट नाऊ' कंपोझिट एलपीजी सिलिंडरसह 5 किलोच्या 'छोटू' सिलिंडरसाठी एक्सप्रेस डिलिव्हरी सेवा सुरू केली आहे. या सेवेंतर्गत बुकिंगनंतर चार तासांच्या आत ग्राहकांना सिलिंडर घरपोच मिळणार आहे. इंडियनऑइलचे अध्यक्ष ए. एस. साहनी यांच्या हस्ते या सेवेचा शुभारंभ करण्यात आला. हलका, गंजमुक्त आणि पारदर्शक रचनेचा 'इंडेन एक्स्ट्रालाइट नाऊ' सिलिंडर ग्राहकांना उर्वरित गॅसचे प्रमाण सहज पाहण्याची सुविधा देतो. ग्राहकांच्या पसंतीच्या वेळेनुसार वितरणाची सुविधाही उपलब्ध करण्यात आली आहे. सुरुवातीला ही सेवा पुणे, गुरुग्राम, इंदूर आणि कोयंबतूर येथे उपलब्ध होणार आहे. ऑगस्ट 2026 च्या मध्यापर्यंत आणखी 25 शहरांत आणि ऑक्टोबरअखेर देशातील प्रमुख शहरांत सेवेचा विस्तार केला जाणार आहे. ग्राहक इंडियनऑइल वन ॲप आणि कंपनीच्या ग्राहक संकेतस्थळावरून नवीन जोडणी तसेच रिफिल बुकिंग करू शकतील.

## पौष्टिक नाश्त्यासाठी कॅलिफोर्निया बदाम ठरू शकतात उपयुक्त



पुणे (आरंभ पर्व) : दिवसाची सुरुवात संतुलित आणि पौष्टिक नाश्त्याने केल्यास ऊर्जा टिकवून ठेवण्यासह आरोग्यदायी जीवनशैलीला मदत होऊ शकते. नाश्त्यामध्ये कॅलिफोर्निया बदामांसारख्या पोषकतत्त्वांनी समृद्ध पदार्थांचा समावेश करणे हा सोपा आणि व्यावहारिक पर्याय असल्याचे पोषणतज्ज्ञांनी सांगितले आहे. कॅलिफोर्निया बदामांमध्ये प्रथिने, आरोग्यदायी चरबी, आहारातील तंतू, मॅग्नेशियम आणि जीवनसत्त्व 'ई'सह विविध पोषकतत्त्वे आढळतात. प्रथिने, तंतू आणि आरोग्यदायी चरबी यांच्या मिश्रणामुळे अधिक काळ तृप्तीची भावना टिकून राहण्यास मदत होऊ शकते. मॅक्स हेल्थकेअरच्या आहारशास्त्र विभागाच्या प्रादेशिक प्रमुख ऋतिका समद्दार यांनी संतुलित नाश्त्यात पोषकतत्त्वांनी समृद्ध पदार्थांचा समावेश केल्यास एकूण आरोग्य आणि दिवसभरातील ऊर्जा पातळीला पाठबळ मिळू शकते, असे सांगितले. पोषण व आरोग्य सल्लागार शीला कृष्णस्वामी यांनीही दीर्घकाळ सहज पाळता येतील अशा आरोग्यदायी आहाराच्या सवयी महत्त्वाच्या असल्याचे नमूद केले. अभिनेत्री सोहा अली खान यांनी कॅलिफोर्निया बदाम आपल्या नाश्त्याचा नियमित भाग असल्याचे सांगत, दैनंदिन जीवनातील छोट्या आणि सातत्यपूर्ण आरोग्यदायी निवडी दीर्घकालीन आरोग्यासाठी महत्त्वाच्या असल्याचे मत व्यक्त केले.



## प्लास्टइंडियाचे नवी दिल्लीत प्रादेशिक कार्यालय सुरू; शाश्वततेवर देणार भर

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : भारतीय प्लास्टिक उद्योगाची अग्रगण्य संस्था प्लास्टइंडिया फाउंडेशनने नवी दिल्ली येथे प्रादेशिक कार्यालय सुरू केले आहे. उद्योग, सरकार आणि शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य मजबूत करण्यासह धोरणात्मक पाठपुरावा, नवोन्मेष, कौशल्य विकास आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी हे कार्यालय प्रमुख केंद्र म्हणून कार्य करणार आहे. फाउंडेशनचे उपाध्यक्ष डॉ. राजू देसाई आणि मानद कोषाध्यक्ष धर्मेंद्र गांधी यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. प्लास्टइंडिया फाउंडेशनचे अध्यक्ष रवीश कामथ यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या कार्यालयातून प्लास्टिक उद्योगातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना सहकार्य, उद्योग-शैक्षणिक भागीदारी, पुनर्वापर, परिपत्र अर्थव्यवस्था आणि आधुनिक तंत्रज्ञानाला चालना दिली जाणार आहे. प्लास्टिक उद्योग अधिक जबाबदार, पर्यावरणपूरक आणि भविष्यासाठी सक्षम बनविण्याबरोबरच जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्याचे फाउंडेशनचे उद्दिष्ट आहे. तसेच प्लास्टइंडिया इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून उद्योगाच्या बदलत्या गरजांनुसार कुशल व्यावसायिक तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. नवी दिल्लीतील हे कार्यालय देशभरातील प्लास्टिक उद्योगासाठी कार्य करणार असून पर्यावरण आणि शाश्वततेशी संबंधित आव्हानांवर व्यावहारिक उपाय विकसित करण्यासाठी विविध क्षेत्रांतील संस्थांमध्ये समन्वय साधणार आहे.

## उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेला पहिल्या तिमाहीत ३१७ कोटींचा निव्वळ नफा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत ३१७ कोटी रुपयांचा करपश्चात नफा नोंदविला असून, त्यात वार्षिक २०६.७ टक्क्यांची वाढ झाली आहे. मजबूत आर्थिक कामगिरीच्या पार्श्वभूमीवर बँकेने आर्थिक वर्ष २०२७ साठी मालमत्तेवरील परताव्याचा (आरओए) अंदाज १.८ टक्क्यांवरून २ टक्क्यांपर्यंत वाढविला आहे. जून २०२६ अखेर बँकेच्या ठेवी वार्षिक २४.६ टक्क्यांनी वाढून ४८,१२९ कोटी रुपयांवर, तर एकूण कर्ज खाते २८.९ टक्क्यांनी वाढून ४२,९०३ कोटी रुपयांवर पोहोचले. बँकेच्या शाखांची संख्या ८१४ झाली आहे. सुरक्षित कर्ज पोर्टफोलिओ ४२.७ टक्क्यांच्या वाढीसह २१,६३८ कोटी रुपयांवर पोहोचला असून तो एकूण कर्ज खात्याच्या ५०.४ टक्के आहे. तिमाहीतील कर्ज वितरण ४१.४ टक्क्यांनी वाढून ९,२४५ कोटी रुपये झाले. गृहनिर्माण कर्ज विभाग ४०.८ टक्क्यांनी वाढून ११,२१० कोटी, तर सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग कर्ज विभाग ५४ टक्क्यांनी वाढून ३,४७० कोटी रुपयांवर पोहोचला. बँकेचे निव्वळ व्याज उत्पन्न विक्रमी १,१८६ कोटी रुपये, तर परिचालन नफा ५४८ कोटी रुपये राहिला. सकल आणि निव्वळ अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण अनुक्रमे २.१७ आणि ०.३४ टक्क्यांपर्यंत सुधारले आहे.

# प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सन्मान



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने खेड तालुक्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांचा कनेरसर (ता. खेड ) येथे कार्यक्रमात सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष व लेखक अशोकराव टाव्हरे होते. खेडचे उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेडसे, भुमी-अभिलेखचे उपअधिक्षक नितीन सुर्यवंशी यांनी छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबीराची केलेली प्रभावी अंमलबजावणी, कायदा व सुव्यवस्थेबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे, महावितरणशी निगडीत समस्येबाबत कार्यकारी अभियंता केशव काळुमाळी, सहायक महसुल अधिकारी निलेश घोडके हे नागरिकांच्या समस्या निवारणार्थ करीत असलेली कार्यवाही यामुळे मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे, महावितरणचे कार्यकारी अभियंता केशव काळुमाळी, सहायक महसुल अधिकारी नीलेश घोडके हे वाढदिवसानिमित्त आयोजित आरोग्य शिबीर व विद्यार्थ्यांना वह्या वाटप व सन्मान समारंभास उपस्थित होते. तसेच उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी व उपअधिक्षक, भुमी-अभिलेख यांच्यावतीने कार्यालय प्रतिनिधींनी सन्मान स्वीकारला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोकराव टाव्हरे यांनी केले, तहसीलदार प्रशांत बेडसे, दलित पँथरचे प्रदेशाध्यक्ष सुखदेव सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन जी.टी. फड यांनी केले. तर आभार सुरेखा टाव्हरे यांनी मानले. दलित पँथरचे प्रदेशाध्यक्ष सुखदेव सोनवणे, खेड पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते, राजगुरुनगरचे माजी नगराध्यक्ष शिवाजी मांदळे, भाजपचे खेड तालुका उपाध्यक्ष दिलीप माशेरे, कनेरसरच्या सरपंच सुनीता केदारी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## पक्षाकडून दखल : बालशिवसैनिक ते शिवसेना दौंड शहरप्रमुख

निष्ठा, सामाजिक कार्य आणि संघटनात्मक योगदानाची पावती; जिल्हाप्रमुख महेश पासलकर यांच्या हस्ते नियुक्तिपत्र

**दौंड (दै. आरंभ पर्व)**



शिवसेनेचे निष्ठावान आणि सक्रिय कार्यकर्ते अमोल राजाराम जगताप यांची शिवसेना दौंड शहरप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख महेश (दादा) पासलकर यांच्या हस्ते त्यांना नियुक्तिपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन अमोल जगताप यांनी बालशिवसैनिक म्हणून आपल्या राजकीय आणि सामाजिक कार्याला सुरुवात केली. पक्षाच्या विचारांशी एकनिष्ठ राहत त्यांनी अनेक वर्षे सातत्याने पक्षसंघटनेसाठी काम केले. पक्षाच्या चढ-उताराच्या काळातही निष्ठा आणि समर्पण कायम ठेवत दौंड शहरात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी त्यांनी योगदान दिले.

राजकीय कार्याबरोबरच सामाजिक क्षेत्रातही जगताप यांनी विविध उपक्रम राबविले आहेत. जनहिताच्या प्रश्नांवरील आंदोलने, रक्तदान व आरोग्य शिबिरे, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम, गरजू विद्यार्थ्यांना संगणक संच उपलब्ध करून देणे, पर्यावरण व निसर्ग संवर्धन, ज्येष्ठ नागरिकांसाठी तीर्थयात्रांचे आयोजन तसेच विविध शासकीय योजनांची माहिती आणि लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे.

त्यांच्या या सामाजिक आणि संघटनात्मक कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर दौंड शहरप्रमुखपदाची जबाबदारी सोपविली आहे. जगताप यांच्या नियुक्तीमुळे दौंड शहरातील पक्षसंघटना अधिक मजबूत होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या निवडीबद्दल शिवसैनिक, पदाधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## आयडीएफसी फर्स्ट बँकेचा विक्रमी ₹१,०७५ कोटी निव्वळ नफा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

आयडीएफसी फर्स्ट बँकेने आर्थिक वर्ष 2027 च्या पहिल्या तिमाहीत आतापर्यंतचा सर्वाधिक ₹1,075 कोटींचा तिमाही निव्वळ नफा नोंदविला आहे. मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीतील ₹463 कोटींच्या तुलनेत नफ्यात तब्बल 132.4 टक्क्यांची वाढ झाली आहे. कर्जवाटपातील दमदार वाढ, ठेवींमध्ये झालेली वाढ आणि मालमत्ता गुणवत्तेतील सातत्यपूर्ण सुधारणा यामुळे बँकेची आर्थिक कामगिरी मजबूत राहिली. बँकेने 30 जून 2026 रोजी संपलेल्या आर्थिक वर्ष 2027 च्या पहिल्या तिमाहीचे अनलेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर केले. बँकेचा एकूण ग्राहक व्यवसाय म्हणजेच कर्जे आणि ग्राहक ठेवी मिळून ₹6,04,776 कोटींवर पोहोचला. मागील वर्षी याच कालावधीत तो ₹5,10,031 कोटी होता. यामध्ये वार्षिक आधारावर 18.6 टक्क्यांची वाढ झाली.

## पुण्यात 'स्टेनलेस स्टील कनेक्ट २०२६' उत्साहात



- संभव स्टीलच्या उपक्रमात १०० हून अधिक स्टील विक्रेत्यांचा सहभाग

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संभव स्टील ट्यूब्स लिमिटेडच्या स्टेनलेस स्टील विभागाने श्री साई स्टील (तापी) आणि आशापुरी स्टील (पुणे) यांच्या सहकार्याने पुण्यात 'स्टेनलेस स्टील कनेक्ट २०२६' कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमात पुणे आणि परिसरातील १०० हून अधिक स्टील विक्रेत्यांनी सहभाग घेतला. संभव स्टीलच्या स्टेनलेस स्टील विभागाचे राष्ट्रीय विक्री प्रमुख बृजेश त्रिपाठी यांनी कंपनीच्या उत्पादन सुविधा, गुणवत्ता मानके आणि स्टेनलेस स्टील उत्पादनांची माहिती दिली.

## सरपंच आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांना यश

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

### दलित वस्तीत प्रकाशझोत!



स्वामी चिंचोली गावातील दलित वस्तीतील नागरिकांची गेल्या अनेक वर्षांपासूनची अंधाराची समस्या अखेर दूर झाली आहे. प्रशासक सरपंच सौ. पुनम मदने आणि ग्रामविकास अधिकारी श्रीमती. स्वाती लोंढे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

दलित वस्तीतील रस्ते रात्रीच्या वेळी पूर्णपणे अंधारात बुडालेले असायचे.त्यामुळे नागरिकांना, विशेषतः महिला व शाळकरी मुलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन प्रशासक सरपंच सौ. पुनम मदने आणि ग्रामविकास अधिकारी श्रीमती. स्वाती लोंढे यांनी महावितरण कंपनीला लेखी पत्र देऊन तातडीने प्रकाश व्यवस्था करण्याची मागणी केली होती.

त्यांच्या पत्राची त्वरित दखल घेत महावितरणचे सहाय्यक अभियंता श्री.मुंघसे साहेब यांनी गावातील दलित वस्तीमध्ये कर्मचारी यांना पाठवून पोल व तारा ओढून प्रकाश व्यवस्थेची सोय केली आहे.

लाईट सुरू झाल्यानंतर ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. "आता रात्री निर्भयपणे परिसरामध्ये वावर करता येईल" अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.

या कामासाठी सहकार्य केल्याबद्दल ग्रामस्थांनी प्रशासक सरपंच सौ.पुनम मदने, ग्रामविकास अधिकारी श्रीमती. स्वाती लोंढे तसेच महावितरणचे सहाय्यक अभियंता श्री.मुंघसे साहेब व त्यांच्या टीमचे आभार मानले.

# 'रायव्हल्स'तर्फे पुण्यातून 'कॉलेज रायव्हल्स सीझन ४'ची केली सुरुवात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




'ॲम्पव्हर्स डीएमआय'चा गेमिंग आणि एंटरटेनमेंट प्लॅटफॉर्म "रायव्हल्स' आता व्यावसायिक ई-स्पोर्ट्स आणि गेमिंगच्या क्षेत्रात मोठा विस्तार करत आहे. या विस्ताराचा भाग म्हणून रायव्हल्सने 'प्रो रायव्हल्स' या नव्या राष्ट्रीय ई-स्पोर्ट्स स्पर्धेची घोषणा केली आहे. यासोबतच 'कॉलेज रायव्हल्स'चा आतापर्यंतचा सर्वात मोठा चौथा सीझनही सुरू झाला आहे. 'प्रो रायव्हल्स'ची पहिली आवृत्ती १७ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित केली जात आहे. सहा फेऱ्यांच्या या राष्ट्रीय स्पर्धेसाठी देशभरातून जवळपास १,००० संघांनी सहभाग नोंदवला आहे. या स्पर्धेत एकूण ७ लाख रुपयांची बक्षीस रक्कम ठेवली आहे; ज्यामध्ये विजेत्या संघाला ३ लाख रुपये, उपविजेत्याला २ लाख रुपये आणि तिसऱ्या क्रमांकावरील संघाला १ लाख रुपये दिले जातील. तसेच, 'मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर' आणि 'फॅन फेव्हरेट' यांना वैयक्तिक पुरस्कार दिले जातील आणि प्रत्येक विजेत्याला ५०,००० रुपये मिळतील. पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने होणाऱ्या या स्पर्धेची सांगता भारताच्या आघाडीच्या संघांमधील 'प्रो रायव्हल्स' चॅम्पियनशिपचे पहिले विजेतेपद मिळवण्यासाठीच्या अंतिम लढतीने होईल. ॲम्पव्हर्सचे सह-संस्थापक आणि ग्रुप सीईओ, चार्ली बेली म्हणाले, ""प्रो रायव्हल्स'हे 'रायव्हल्स' प्लॅटफॉर्मच्या उत्क्रांतीमधील पुढचे पाऊल आहे. गेमिंग समुदाय जसजसे प्रगल्भ होत आहेत, तसतसे खेळाडू उच्च स्तरावर स्पर्धा करण्याच्या आणि अधिक सक्षम प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध स्वतःला आव्हान देण्याच्या संधी शोधत आहेत. 'प्रो रायव्हल्स'च्या माध्यमातून आम्ही 'रायव्हल्स'चा अनुभव कॅम्पसच्या पलीकडे नेत आहोत. आम्ही स्पर्धात्मक खेळासाठी एक नवीन व्यासपीठ तयार केले आहे, जे 'कॉलेज रायव्हल्स'ला पूरक ठरेल आणि संपूर्ण 'रायव्हल्स' इको सिस्टीमला बळकट करेल." 'कॉलेज रायव्हल्स सीझन ४' ने पुण्यातून आपल्या देशव्यापी प्रवासाची सुरुवात केली आहे, ज्यामुळे विद्यार्थी आणि गेमिंगचे एक प्रमुख केंद्र म्हणून या शहराचे स्थान पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अजिंक्य डी. वाय. पाटील, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ((व्हीआयआयटी), एआयएसएसएमएस इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, एनएमआयईटी पुणे, डी.वाय. पाटील वराळे, श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, सिंहगड एसबीएनएसटीएस आणि डी.वाय. पाटील आकुर्डी अशा १० नामांकित महाविद्यालयांमध्ये हा पुणे टप्पा दोन आठवड्यांत राबविला जाईल. त्यानंतर हा उपक्रम देशभरातील ४० हून अधिक शहरांमधील १०० हून अधिक महाविद्यालयांच्या कॅम्पसपर्यंत विस्तारला जाईल. विद्यार्थी बीजीएमआय सोलो,जीएमआय फीमेल, जीएमआय स्क्वाड आणि ईए स्पोर्ट्स एफसी मोबाइल या स्पर्धांमध्ये भाग घेतील, तसेच 'रायव्हल्स आर्केड' द्वारे कम्युनिटी गेमिंगचा अनुभव घेतील. चौथ्या पर्वामध्ये काही निवडक कॅम्पसवर स्पर्धात्मक प्रकार म्हणून बुद्धिबळाचा देखील समाविष्ट करण्यात आले आहे, ज्यामुळे या प्लॅटफॉर्मच्या गेमिंग पोर्टफोलिओचा विस्तार होईल आणि विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी नवीन संधी निर्माण होतील.

ॲम्पव्हर्स डीएमआय च्या इंडिया बिझनेस हेड, सुमेधा महाजन म्हणाल्या, "पुणे ही नेहमीच आमच्यासाठी सर्वात मजबूत बाजारपेठांपैकी एक राहिली आहे. येथे अत्यंत उत्साही विद्यार्थी समुदाय आहे आणि गेल्या तीन सीझन्समध्ये सातत्याने प्रचंड सहभाग दिसून आला आहे. त्यामुळे 'कॉलेज रायव्हल्स सीझन ४' ची सुरुवात येथून करणे ही आमच्यासाठी स्वाभाविक बाब होती. शैक्षणिक उत्कृष्टता आणि बहरलेली युवा संस्कृती यांचा संगम असलेले शहर म्हणून, पुणे 'कॉलेज रायव्हल्स' च्या मूळ उद्देशाचे उत्तम प्रतिनिधित्व करते.

या सीझनमध्ये, आम्ही अधिक कॅम्पसपर्यंत पोहोचून, नवीन स्पर्धात्मक प्रकार सादर करून आणि गेमिंग, मनोरंजन व युवा संस्कृतीशी जोडले जाण्यासाठी विद्यार्थ्यांना अधिक समृद्ध संधी उपलब्ध करून देऊन हा अनुभव एका नव्या उंचीवर नेत आहोत.

## ग्रामपंचायत हिंगणीबेर्डी, ता. दौंड, जि. पुणे.

**बी-१ टेंडर पेपर नोटीस क्र. १ सन २०२६ -२०२७**

ग्रामपंचायत हिंगणीबेर्डी, ता. दौंड, जि. पुणे. यांच्याकडून खालील नमूद कामंची निविदा बी-१ निविदा पद्धतीने (दोन पाकीट पद्धतीने) जिल्हा परिषदेकडील योग्य त्या वर्गवारीतील नोंदणीकृत ठेकेदारांकडून, नोंदणीकृत पुरवठादार यांजकडून मागवण्यात येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत हिंगणीबेर्डी, ता. दौंड, जि. पुणे. यांस कडून दिनांक २७/०७/२०२६ ते ०३/०८/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक २७/०७/२०२६ ते ०३/०८/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सीलबंद निविदा सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायतमध्ये पोस्टाने अथवा समक्ष स्वीकारण्यात येतील. सदर सीलबंद निविदा प्रशासक साहेब यांच्या टिपणीने कार्यालयीन वेळेत मंगळवार दिनांक ०४/०८ / २०२६ रोजी उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा प्रसिद्ध दिनांक | टेंडर फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे हिंगणीबेर्डी ता. दौंड येथील विठ्ठल नगर RO दुरुस्ती करणे. | १८४६७०/- | २७/०७/२०२६ | ५००/- | १८४६/- |
| २ | मौजे हिंगणीबेर्डी ता. दौंड येथील जोतीबा नगर नवीन RO बसविणे. | २५७०००/- | | | २५७०/- |

नियम, अटी व शर्ती

१) कोणत्याही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवलेला आहे.

२) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत हिंगणीबेडर्डी, ता. दौंड, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे. शाखा दौंड, खाते क्र. ००३००२५००००००८ (IFSC - HDFC0CPDCCB) वर भरल्यानंतर उपलब्ध होतील.

३) इसारा रक्कम ग्रामपंचायत हिंगणीबेर्डी, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे. शाखा दौंड, खाते क्र. ००३००२५००००००८ (IFSC - HDFC0CPDCCB) वर भरल्याची पावती जोडण्यात यावी. किंवा ग्रामपंचायतच्या नावे डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

४) आपण तांत्रिक लिफाफा वेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल. आपण सर्व नियमांस पात्र झाले नंतरच आर्थिक लिफाफा खोलण्यात येईल. सदर निविदबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करण्याचा तसेच निविदा स्वीकारण्याचा आथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायत हिंगणीबेर्डी, ता. दौंड, जि. पुणे. यांनी स्वतः कडे राखून ठेवलेले आहेत.

सही/-
मा. प्रशासक साहेब / ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत हिंगणीबेर्डी, ता. दौंड, जि. पुणे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### झी५ची सात भाषांमध्ये आतापर्यंतची सर्वात व्यापक मनोरंजन मालिका

मुंबई (आरंभ पर्व) : स्वदेशी व्हिडिओ प्रवाह मंच झी५ने सात भारतीय भाषांमध्ये आपली आतापर्यंतची सर्वात व्यापक बहुभाषिक मनोरंजन मालिका सादर केली आहे. हिंदी, तमिळ, तेलुगू, मराठी, मल्याळम, कन्नड आणि बांग्ला भाषांतील चित्रपट, वेबमालिका, थेट क्रीडा प्रक्षेपण, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कथाकथन, ॲनिमेशन आणि बालमनोरंजनाचा यामध्ये समावेश आहे. मराठी प्रेक्षकांसाठी 'हे काय नवीन?'चा नवा हंगाम, 'अगा आई, आहो आई' ही नवीन मालिका तसेच 'तुंबाडची मंजुला' आणि 'भूतं भयम्' हे चित्रपट सादर केले जाणार आहेत. हिंदीमध्ये 'कांबळी', 'द स्कॅम : लीक्ड', 'कॉफी किंग', 'रंगबाझ सीझन ४' यांसह अनेक नव्या मालिका आणि चित्रपटांचा समावेश आहे. तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम आणि बांग्ला भाषांमध्येही नवीन कथा आणि लोकप्रिय मालिकांचे पुढील हंगाम पाहायला मिळणार आहेत. झी५चे व्यवसाय प्रमुख तेजकरण सिंग बजाज यांनी सांगितले की, सात भाषांमधील चित्रपट, मालिका, क्रीडा, कृत्रिम बुद्धिमत्ता, ॲनिमेशन आणि बालमनोरंजनाच्या माध्यमातून विविध प्रकारच्या कथा एकाच मंचावर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रेक्षकांच्या बदलत्या आवडीनुसार अधिक वैयक्तिक आणि तंत्रज्ञानाधारित मनोरंजन अनुभव देण्यावरही भर राहणार आहे. नव्या बहुभाषिक मनोरंजन मालिकेसह भारतीय संस्कृतीशी जोडलेल्या आणि विविध भाषांतील प्रेक्षकांना आकर्षित करणाऱ्या कथांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा झी५चा उद्देश आहे.

### राष्ट्रकुल खेळात भारताचे प्रतिनिधित्व करणार केंद्राचे तीन खेळाडू




मुंबई (आरंभ पर्व) : ओडिशा एएम/एनएस इंडिया जिम्नॅस्टिक्स हाय-परफॉर्मन्स सेंटरच्या तीन खेळाडूंची ग्लासगो, स्कॉटलंड येथे होणाऱ्या राष्ट्रकुल खेळ २०२६ साठी भारतीय संघात निवड झाली आहे. तपन मोहंती, तपेश्वरनाथ दास आणि ऑलिम्पियन प्रणती नायक हे भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स प्रकारातील भारतीय संघात एकूण आठ खेळाडूंचा समावेश असून, त्यापैकी तीन खेळाडू ओडिशा एएम/एनएस जिम्नॅस्टिक्स हाय-परफॉर्मन्स सेंटरचे आहेत. तपन मोहंती आणि तपेश्वरनाथ दास पुरुष आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स संघातून, तर प्रणती नायक महिला आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स संघातून खेळणार आहे. एएम/एनएस इंडियाचे संचालक व उपाध्यक्ष आशुतोष तेलंग यांनी तिन्ही खेळाडूंच्या निवडीबद्दल अभिनंदन करत त्यांच्या कामगिरीमुळे केंद्रातील जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि खेळाडूंच्या सर्वांगीण विकासाचे प्रतिबिंब दिसत असल्याचे सांगितले. हे राष्ट्रकुल खेळ २३ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ दरम्यान ग्लासगो येथे होणार आहेत.

### कापूस पिकावरील कीड नियंत्रणासाठी बायरचे 'ट्रान्स' बाजारात




पुणे (आरंभ पर्व) : कापूस उत्पादक शेतकऱ्यांना रस शोषणाऱ्या किडींच्या व्यवस्थापनासाठी मदत करण्याच्या उद्देशाने बायरने 'ट्रान्स' हे नवीन कीटकनाशक भारतीय बाजारात सादर केले आहे. मावा, तुडतुडे आणि पांढरी माशी यांसारख्या प्रमुख किडींच्या नियंत्रणासाठी हे उत्पादन उपयुक्त ठरणार असल्याचे कंपनीने म्हटले आहे. 'ट्रान्स'मध्ये दोन पूरक कार्यपद्धतींचा समावेश असून विद्यमान तसेच नवीन येणाऱ्या पानांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने ते विकसित करण्यात आले आहे. फवारणीनंतर दोन तासांनी पाऊस झाल्यासही उत्पादनाच्या परिणामकारकतेवर परिणाम होणार नसल्याचा दावा कंपनीने केला आहे. एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीमध्येही त्याचा समावेश करता येणार आहे. बायरच्या क्रॉप सायन्स विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मोहन बाबू यांनी सांगितले की, अनेक किडींचा एकत्रित प्रादुर्भाव आणि वाढती प्रतिकारक्षमता लक्षात घेऊन 'ट्रान्स' विकसित करण्यात आले आहे. यामुळे पीक आरोग्य, उत्पादकता आणि शेतकऱ्यांचा नफा सुधारण्यास मदत होईल, असा कंपनीचा दावा आहे. हे उत्पादन जुलै २०२६ पासून महाराष्ट्रासह गुजरात, मध्य प्रदेश, तमिळनाडू, राजस्थान, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, पंजाब आणि हरियाणामध्ये १००, २२० आणि ५०० मिलीच्या पॅकमध्ये उपलब्ध होणार आहे.

### पीएनबी मेटलाईफचे वैयक्तिक दावा निपटारा प्रमाण ९९.८१ टक्के

- आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ₹५२६.६२ कोटींच्या ६,१८८ वैयक्तिक दाव्यांचा निपटारा

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : पीएनबी मेटलाईफने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये वैयक्तिक विमा दाव्यांच्या निपटाऱ्याचे प्रमाण ९९.८१ टक्के नोंदविले आहे. तर सामूहिक दावा निपटाऱ्याचे प्रमाण ९९.७० टक्के राहिल्याची माहिती कंपनीने दिली. कंपनीने या आर्थिक वर्षात सुमारे ₹५२६.६२ कोटींच्या ६,१८८ वैयक्तिक दाव्यांचा, तर ₹५०२.६९ कोटींच्या ६,८६८ सामूहिक दाव्यांचा निपटारा केला. आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर ९९.९८ टक्के दावे ३० दिवसांच्या आत, ९५ टक्के दावे सात दिवसांत आणि ३५ टक्के दावे एका दिवसात निकाली काढण्यात आल्याचे कंपनीने म्हटले आहे. 'दावा निपटाऱ्याची हमी – ३ तास' या उपक्रमांतर्गत ₹५६.६७ कोटींचे १,६८१ दावे अवघ्या तीन तासांत निकाली काढण्यात आले. ग्राहकांना ॲप, संकेतस्थळ, व्हॉट्सॲप तसेच बँक आणि कंपनीच्या शाखांमधून दावा नोंदविण्याची सुविधा उपलब्ध आहे. पीएनबी मेटलाईफचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी समीर बन्सल यांनी जलद सेवा, डिजिटल सुविधा आणि वैयक्तिक सहकार्याच्या माध्यमातून ग्राहकांचा विश्वास अधिक मजबूत करण्यावर कंपनीचा भर असल्याचे सांगितले.

# अजितदादा पवार यांची जयंती जवळगावमध्ये विविध उपक्रमांनी साजरी





**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जवळगाव नं. २ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच जवळगाव नं. १ येथील रामगिरी विद्यालयात विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

जवळगाव नं. १ येथील रामगिरी विद्यालयात अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन, विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण, वृक्षारोपण तसेच खाऊ वाटप असे विविध उपक्रम उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत अजितदादा पवार यांना विनम्र अभिवादन केले.

तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जवळगाव नं. १ येथेही जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेस, स्पोर्टचे साहित्य वाटप, वृक्षारोपण आणि खाऊ वाटप करण्यात आले.

या विविध कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सोलापूर जिल्हा सरचिटणीस प्रमोद सुरेश कापसे यांनी केले होते

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जवळगाव नं. २ येथे झालेल्या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सोलापूर जिल्हा सरचिटणीस प्रमोद सुरेश कापसे, जिल्हा सरचिटणीस नागेश चव्हाण ,युवक उपाध्यक्ष समाधान पवार, सुरेशभाऊ कापसे, सरपंच अनिता धेंडे, ग्रामपंचायत सदस्य समाधान ढेंगळे, बालाजी वीर, समाधान कापसे, बालाजी कापसे, नितीन कापसे, श्रीकांत ढेंगळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अशोक कापसे, उपाध्यक्ष अमोल कापसे, सदस्य नरहरी कोळी, अक्षय चव्हाण, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रमोद सुरेश कापसे यांनी शाळेला दोन संगणक संच भेट दिले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले आणि शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक सोमेश्वर देशमाने यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

## हर्षदा फरांदे यांची भाजप महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी निवड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी हर्षदा अभिजीत फरांदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्या नेतृत्वात काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले.



हर्षदा फरांदे म्हणाल्या, "पक्ष संघटनेने माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने काम करेन. संघटनेला अधिक बळकटी देण्याची संधी मी निश्चितच आत्मसात करेन. महिला मोर्चाचे जाळे राज्यभर अधिक सक्षम करण्यासाठी आणि पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी वेळोवेळी प्रयत्नशील राहीन."

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माझ्यावर जाबबदारी सोपवून दाखवलेल्या विश्वासास निश्चित पात्र ठरू असा विश्वास हर्षदा फरांदे यांनी व्यक्त केला.

## रक्तदान सामाजिक कार्य समजून प्रत्येकाने रक्तदान करावे : आ. तापकीर

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नांदेड मध्ये रक्तदान शिबिर संपन्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त खडकवासला विधानसभा मतदारसंघात समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यानिमित्त शिवशंभो ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिर पार पडले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून शेकडो रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जपली.

रक्तदान शिबिराला खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर आणि पुणे शहर भाजपचे शहराध्यक्ष धीरजभाऊ घाटे यांनी भेट देऊन रक्तदात्यांशी संवाद साधला. रक्तदानासारख्या मानवतेच्या कार्यात सहभागी झालेल्या प्रत्येक रक्तदात्याचे त्यांनी अभिनंदन करत, "रक्तदान हे सर्वोच्च समाजसेवा असून एका रक्तदात्यामुळे अनेकांना नवजीवन मिळू शकते," असे सांगत युवकांनी अशा उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

या शिबिरास मंडलाध्यक्ष विजयभाऊ मते, नरसिंहभाऊ लगड, नगरसेवक सुभाष नाणेकर, नगरसेविका धनश्री कोल्हे, महिला मोर्चा शहराध्यक्ष मनीषा लडकत, उपस्थित होते. ह्या रक्तदान शिबिरास महिला मोर्चा आघाडी अध्यक्ष मनीषा मोरे, महाराष्ट्र प्रदेश ओबीसी मोर्चाचे सचिव दत्ताभाऊ कोल्हे, प्रभागाध्यक्ष सचिनभाऊ दांगट, किसान मोर्चा अध्यक्ष अरुणभाऊ दांगट, पुणे उपजिल्हाध्यक्ष अनिलभाऊ मते, पुणे शहर ओबीसी मोर्चाचे सरचिटणीस रमेशबापू गायकवाड, युवा मोर्चा अध्यक्ष निखिल धावडे, विशाल कदम, तुषार पोकळे, तेजस हुलावळे, माजी सरपंच नितीन दुगाणे, प्रकाश आगाशे, अभिषेक कांबळे, विशाल भोसले, गणेश गावंडे, प्रवीण पाटील, सायली भोसले, सुप्रिया करमकर, स्मिता पासलकर, योजना जाधव, गौतमी कांबळे, स्मिता कालगुडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी रक्तदान केले. रक्तदान हेच जीवनदान असल्याचा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजासाठी उपयुक्त ठरणारा हा उपक्रम राबविण्यात आल्याबद्दल उपस्थितांनी आयोजकांचे कौतुक केले. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त नऱ्हेत रक्तदान शिबिर संपन्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नऱ्हे येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या उपाध्यक्ष कोमल सतीश कुटे (दळवी) यांच्या पुढाकाराने तसेच भाजप प्रभाग ३४ अध्यक्ष राजूदादा प्रभाकर कुटे यांच्या नेतृत्वाखाली हा सामाजिक उपक्रम पार पडला.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक सचिन मोरे, खडकवासला मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे, नऱ्हे गावचे माजी सरपंच पोपटराव खेडेकर, माजी उपसरपंच अक्षय इंगळे, माजी उपसरपंच सुशांत कुटे, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रदीप कुटे, स्वप्निल कुटे, तेजस कुटे, आभि कुटे आणि निलेश लांडगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असून रक्तदान हेच सर्वात मोठे दान आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपली आहे," असे नगरसेवक सचिन मोरे म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून रक्तदान केले. गरजू रुग्णांसाठी रक्ताचा साठा उपलब्ध व्हावा, या उद्देशाने आयोजित उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी रक्तदाते, मान्यवर, कार्यकर्ते व सर्व सहकाऱ्यांचे आयोजक राजूदादा कुटे यांनी आभार मानले.

## "पाच फुटाचा बच्चन" मधून दुमदुमणार राम कृष्ण हरीचा गजर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नाटकाचं रुपांतर चित्रपटात होण्याच्या आजवरच्या यशस्वी परंपरेत आता आणखी एका सिनेमाचे नाव जोडले जाणार आहे. एकपात्री प्रायोगिक नाटक असलेली 'पाच फुटाचा बच्चन' ही गोष्ट आता चित्रपटातून मोठ्या पडद्यावर येत आहे. चित्रपटात तगडी स्टारकास्ट पाहायला मिळणार असून, लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पहिलेवहिले टीजर पोस्टर आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आले आहे. कौस्तुभ रमेश देशपांडे यांनी चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन केलं आहे. राहुल कर्णिक आणि ऑर्फियस स्टुडिओज् यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटात गौरी नलावडे, शशांक शेंडे, चिन्मयी सुमित, क्षितिश दाते, किशोर कदम, आशय कुलकर्णी, पुष्कराज चिरपुटकर, ओमप्रकाश शिंदे, समीर पाटील, विनोद वणवे यांच्या महत्वाच्या भूमिका आहेत. अभिषेक शेटे यांचं छायांकन, सौरभ प्रभुदेसाई यांचं संकलन, शंतनु-दिनेश यांचं ध्वनी आरेखन आहे.

## खेडेकर हॉस्पिटल येथे मोफत दंत व नेत्र उपचार केंद्राचा शुभारंभ



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या वतीने कै. द्रोपदाबाई मुरलीधर खेडेकर हॉस्पिटल, बोपोडी येथे मोफत दंत व नेत्र तपासणी व उपचार केंद्राचे उद्घाटन आज उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते पार पडले. या केंद्रामुळे पुणेकरांना त्यांच्या परिसरातच मोफत व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होणार असून, नागरिकांच्या आरोग्य संवर्धनासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या नव्या केंद्रामध्ये एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल यांच्या सहकार्याने नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी व उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच डी. वाय. पाटील डेंटल कॉलेज यांच्या सहकार्याने मोफत दंत तपासणी व उपचार सेवा देखील सुरू करण्यात आली आहे. सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा सहज आणि मोफत उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. ही सुविधा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावी यासाठी माजी उपमहापौर सुनीता परशुराम वाडेकर यांनी विशेष पुढाकार घेतल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान कै. बाबुराव शेवाळे दवाखान्यात लवकरच मोफत कॅन्सर केअर, डायग्नोस्टिक व सपोर्ट सेंटर सुरू करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच बोपोडी येथील संजय गांधी रुग्णालयात अत्याधुनिक आयसीयू (ICU) बेडची सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास माजी उपमहापौरसुनीता परशुराम वाडेकर, नगरसेवक सनी निम्हण, नगरसेविका भक्ती गायकवाड, नगरसेविका सपना छाजेड, पुणे महानगरपालिकेच्या अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर (IAS), आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे, रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. नितीन धमाले, पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. संतोष मराठे यांच्यासह विविध मान्यवर, आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आषाढी एकादशी निमित्त श्री स्वामी बॅग्ज व शांतीनिकेतन सेवा प्रतिष्ठानतर्फे

## २५ हजार तुळशी, फळझाडे, फुलझाडे व औषधी रोपांचे वाटप





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत श्री स्वामी बॅग्ज व शांतीनिकेतन सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने श्री क्षेत्र विठ्ठलवाडी येथे तब्बल २५ हजार तुळशी, फळझाडे, फुलझाडे व औषधी रोपांचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमाला भाविक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र विठ्ठलवाडी कमान येथे झालेल्या या कार्यक्रमात मोठ्या संख्येने वारकरी, भाविक तसेच पर्यावरणप्रेमींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या माध्यमातून धार्मिक परंपरेसोबतच वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या प्रसंगी निवृत्त.एटीएस प्रमुख मा. भानुप्रताप बर्गे यांनी कार्यक्रमाला सदिच्छा भेट दिली. तसेच त्यांच्या वाढदिवसानिमित्त श्री स्वामी बॅग्ज मित्र परिवार व शांतीनिकेतन सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने त्यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनीही या उपक्रमास भेट देऊन आयोजकांचे अभिनंदन केले व पर्यावरण संवर्धनासाठी राबविण्यात येणारे असे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत आपल्या सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमास , माजी उपमहापौर नगरसेवक ॲड. प्रसन्नदादा जगताप, श्री स्वामी बॅग्जचे संचालक राहुल जगताप, शांतीनिकेतन सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक परदेशी, वैभवी जगताप, प्रणोती जगताप, वेदांत पांचाळ, साहिल उणेचा, सर्वज्ञ परदेशी, प्रतिक पेडामकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि भाविक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना राहुल जगताप म्हणाले की, "पर्यावरणाचे रक्षण करणे ही संतांची शिकवण आहे. संतांच्या विचारांचा वारसा जपत वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे. त्याच उद्देशाने आषाढी एकादशीच्या निमित्ताने या रोपवाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे."

कार्यक्रमादरम्यान नागरिकांना तुळशी, विविध फळझाडे, फुलझाडे आणि औषधी वनस्पतींची रोपे मोफत वितरित करण्यात आली. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळण्याबरोबरच धार्मिक उत्सवातून सामाजिक बांधिलकीचा संदेशही प्रभावीपणे देण्यात आला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अजितदादा पवार यांची जयंती साजरी

दौंड (आरंभ पर्व) : वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज माध्यमिक विद्यामंदिर, दौंड या ठिकाणी आज दिनांक 22 जुलै रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय माननीय अजित दादा पवार साहेब यांच्या जयंतीनिमित्त संस्थेचे सचिव आदरणीय श्री सुभाष डावरे सर यांनी, स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक, श्री सोमनाथ लवंगे सर, यांनी विद्यार्थ्यांना, स्वर्गीय अजित दादा पवार, यांची विस्तृत माहिती सांगितली. त्यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुनिता गायकवाड मॅडम व सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### दौंड तालुक्यातील वाटलूज येथून दिंडी सोहळ्याचे उत्साहात प्रस्थान

दौंड (आरंभ पर्व) : दरवर्षी प्रमाणे यंदाही वाटलूज ता दौंड येथून श्री भैरवनाथ प्रासादिक दिंडी चे आळंदी ते पंढरपूर पायी वारी साठी पुणे येथून पायी चालत पंढरपूर कडे आज प्रस्थान झाले. हा सोहळा गेली 20 वर्षापासून दरवर्षी अविरत पणे चालू आहे. कै. पैलवान बापूराव मंजाबा शेंडगे यांनी 20 वर्षापूर्वी गावातून दिंडी चालू केली होती त्यांना कै विठ्ठल महाराज काकडे यांनी मार्गदर्शन केले होते आजही सर्व वारकरी मंडळी गावकऱ्यांच्या मदतीने ही दिंडी काढत असतात यामधे प्रामुख्याने श्री कालिदास भाऊ कदम श्री नानासाहेब शेंडगे फुलचंद शेंडगे अशोक शेंडगे बाळासाहेब शेंडगे माऊली झिटे भाऊसाहेब शेंडगे गणेश शेंडगे दादा कांबळे धनंजय कदम नाना कांबळे विठ्ठल पालखे बापूराव गोफणे संजय काटकर बापूराव शेंडगे व इतर सर्व वारकरी सहभागी होतात. या सोहळ्याला सर्व प्रमुख मंडळी जागोजागी पंगती देत असतात तसेच श्री अतुल शेंडगे श्री माऊली झिटे श्री हनुमंत गीताराम शेंडगे यांनी मोफत ट्रॅक्टर ची व्यवस्था केली आहे. या दिंडीचे व्यवस्थापन श्री अक्षय महाराज कदम पाहत असतात त्यांना श्री युवराज शेंडगे श्री नानासाहेब शेंडगे व सर्व ग्रामस्त सहकार्य करत असतात.

### आयक्यूओओ झेड११ लाइट ५जी भारतात दाखल




नवी दिल्ली (आरंभ पर्व) : स्मार्टफोन ब्रँड आयक्यूओओने विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन 'आयक्यूओओ झेड११ लाइट ५जी' भारतीय बाजारात सादर केला आहे. मीडियाटेक डायमेन्सिटी ६३०० प्रोसेसर, ६.७४ इंचाचा १२० हर्ट्झ डिस्प्ले, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित विविध सुविधा आणि ६५०० एमएएच क्षमतेची बॅटरी ही या स्मार्टफोनची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. फोनमध्ये १२०० निट्सपर्यंत ब्राइटनेस असलेला डिस्प्ले देण्यात आला असून २०० टक्के व्हॉल्यूमची सुविधा आहे. एआय क्रिएशन, एआय कॅप्शन्स आणि एआय ट्रान्सक्रिप्ट असिस्ट यांसारखी साधनेही देण्यात आली आहेत. ५० मेगापिक्सलचा सोनी मुख्य कॅमेरा, ४४ वॉट फ्लॅशचार्ज आणि धूळ व पाण्यापासून संरक्षणासाठी आयपी६५ मानांकनही फोनला मिळाले आहे. आयक्यूओओ झेड११ लाइट ५जीच्या ४ जीबी + १२८ जीबी प्रकाराची किंमत ₹१९,४९९, ६ जीबी + १२८ जीबी प्रकाराची ₹२१,४९९, तर ६ जीबी + २५६ जीबी प्रकाराची किंमत ₹२४,४९९ आहे. निवडक बँक कार्डवर ₹१,५०० तत्काळ सवलत आणि तीन महिन्यांपर्यंत विनाव्याज हप्त्यांची सुविधा देण्यात येणार आहे. मिडनाईट ब्लू आणि सोलर फ्लेम या दोन रंगांमध्ये उपलब्ध असलेल्या या स्मार्टफोनची विक्री ३० जुलैपासून सुरू होणार असल्याचे कंपनीने सांगितले.

### ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या निवासस्थानी महाप्रसाद



पुणे (आरंभ पर्व) : आषाढी एकादशीनिमित्त सिंहगड रस्त्यावरील प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विठ्ठलवाडी येथील विठ्ठल मंदिरात लाखो भाविकांनी विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतले. या पार्श्वभूमीवर विठ्ठल मंदिरासमोरील माजी उपमहापौर तथा नगरसेवक ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या निवासस्थानी दरवर्षीप्रमाणे यंदाही महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे विविध पदाधिकारी, माजी व विद्यमान नगरसेवक, नगरसेविका, कार्यकर्ते तसेच प्रभाग क्रमांक २८ मधील विविध पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी महाप्रसादाचा लाभ घेत ॲड. प्रसन्न जगताप यांना शुभेच्छा दिल्या. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमातून सामाजिक सलोखा, आपुलकी आणि भक्तीभावाचा संदेश देण्यात आला. महाप्रसादासाठी उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांचे ॲड. प्रसन्न जगताप व मित्र परिवाराच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी, "दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्वांनी प्रेमाने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला. सर्वांचे प्रेम आणि सहकार्य कायम राहावे, हीच विठ्ठल चरणी प्रार्थना आहे," अशी भावना व्यक्त केली.

### 'कॅनव्हासवरील जीवनाचे प्रतिबिंब' चित्रप्रदर्शन २६ जुलैपासून पुण्यात



पुणे (आरंभ पर्व) :आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार आणि कला क्युरेटर ॲम्बे. डॉ. (एचसी) संजय मौर्य यांच्या पाचव्या एकल चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन पुण्यात करण्यात आले आहे. 'Reflections of Life on Canvas' (कॅनव्हासवरील जीवनाचे प्रतिबिंब) या शीर्षकाखाली होणारे हे प्रदर्शन २६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत शिवाजीनगर येथील बालगंधर्व कला दालनात भरविण्यात येणार आहे. गेल्या ११ वर्षांपासून सातत्याने कलासाधना करणाऱ्या डॉ. मौर्य यांच्या कलाप्रवासातील हा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. त्यांच्या अनुभव, संवेदना आणि जीवनाकडे पाहण्याच्या वैशिष्ट्यपूर्ण दृष्टीचा आविष्कार या प्रदर्शनातील चित्रांमधून पाहायला मिळणार आहे.

# इंदिरा आयव्हीएफच्या नव्या फर्टिलिटी सेंटरचे बाणेर येथे केले उद्घाटन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील अग्रगण्य फर्टिलिटी सर्व्हिस प्रोव्हायडर्सपैकी एक असलेल्या इंदिरा आयव्हीएफने बाणेर, पुणे येथे आपल्या नव्या फर्टिलिटी सेंटरचे उद्घाटन केले आहे. हे ग्रुपचे पुण्यातील ७ वे क्लिनिक आहे. महाराष्ट्रातील वेगाने वाढणाऱ्या रहिवासी भागांमध्ये राहणाऱ्या लोकांपर्यंत आणि जोडप्यांपर्यंत संपूर्ण फर्टिलिटी केअर आणि रिप्रोडक्टिव्ह हेल्थकेअरची सुविधा पोहोचवण्याच्या दिशेने हे आणखी एक पाऊल आहे. हे सेंटर सेकंड फ्लोअर, ला कमर्शियल, बाणेर मेन रोड, रिजन्सी कॉसमॉस बिल्डिंगजवळ, ट्रेंड्स स्टोअरजवळ, पुणे येथे सुरू करण्यात आले आहे. फर्टिलिटी आणि असिस्टेड रिप्रोडक्टिव्ह सर्व्हिसेसच्या संपूर्ण सुविधांनी सुसज्ज असलेले हे सेंटर रुग्णांना इंदिरा आयव्हीएफच्या स्टँडर्ड क्लिनिकल प्रोटोकॉल, लॅबोरेटरी सिस्टम आणि पेशंट केअर प्रोसेसेसच्या माध्यमातून उपचार सेवा देईल. उद्घाटन समारंभात विशेष पाहुणे झोनल बिझनेस डायरेक्टर अँड सेंटर हेड इंदिरा आयव्हीएफ पुणे डॉ. अमोल लुंकड, स्पेशल गेस्ट डॉ. शशिकांत आव्हाड, स्त्रीरोगतज्ज्ञ व आयव्हीएफ विशेषज्ञ, इंदिरा आयव्हीएफ, पिंपरी-चिंचवड, पुणे, या प्रसंगी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अँड सेंटर हेड इंदिरा आयव्हीएफ बानेर डॉ. जयदीप काळे तसेच वरिष्ठ वैद्यकीय व्यावसायिक आणि प्रतिनिधींनीही सहभाग घेतला. विस्तारावर भर देत इंदिरा आयव्हीएफ लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर नितीज मुर्डिया यांनी सांगितले की, पुणे हे एक महत्त्वाचे हेल्थकेअर हब बनले आहे आणि इथे ऑर्गनाइज्ड फर्टिलिटी सर्व्हिस वेगाने वाढत आहे. , बाणेर येथील आमचा विस्तार सेंटर्सच्या मोठ्या नेटवर्कच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोच वाढवण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे. त्याचबरोबर, आम्ही प्रत्येक इंदिरा आयव्हीएफ क्लिनिकमध्ये क्लिनिकल प्रोटोकॉल, लॅबोरेटरी सिस्टम आणि रुग्णांच्या केअरचा समान स्टँडर्ड राखण्यासाठीही कटिबद्ध आहोत.

झोनल बिझनेस डायरेक्टर अँड सेंटर हेड इंदिरा आयव्हीएफ पुणे डॉ. अमोल लुंकड यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांत फर्टिलिटीबाबत जागरूकता वाढली आहे आणि अधिकाधिक लोक सुरुवातीच्या टप्प्यातच वैद्यकीय सल्ला घेण्यासाठी पुढे येत आहेत. बाणेर सेंटर याच सकारात्मक बदलाला पाठबळ देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. हे सेंटर स्टँडर्ड क्लिनिकल आणि लॅबोरेटरी प्रॅक्टिसच्या माध्यमातून स्ट्रक्चर्ड फर्टिलिटी तपासणी, एव्हिडन्स बेस्ड ट्रीटमेंट प्लॅनिंग आणि निरंतर केअरची सुविधा देते.

डॉ. शशिकांत आव्हाड, स्त्रीरोगतज्ज्ञ व आयव्हीएफ विशेषज्ञ, इंदिरा आयव्हीएफ, पिंपरी-चिंचवड, पुणे यांनी सांगितले की, फर्टिलिटी ट्रीटमेंट केवळ वैद्यकीय प्रोसीजर्सपुरते मर्यादित नसते. यासाठी प्रत्येक रुग्णाच्या क्लिनिकल प्रोफाइलनुसार योग्य काउन्सेलिंग, स्पष्ट चर्चा आणि पर्सनलाइज्ड ट्रीटमेंट प्लॅनिंगची गरज असते. बाणेर सेंटरमध्ये आमचे उद्दिष्ट असे वातावरण उपलब्ध करून देणे आहे, जिथे रुग्णांना त्यांच्या फर्टिलिटी प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर संपूर्ण मार्गदर्शन मिळू शकेल.

एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अँड इंदिरा आयव्हीएफ बाणेर सेंटर हेड डॉ. जयदीप काळे यांनी सांगितले की, इथे सेंटर सुरू झाल्यामुळे आम्ही रुग्णांना त्यांच्याच परिसरात सेवा देत आहोत, ज्यामुळे त्यांना दूरच्या शहरांमध्ये प्रवास करण्याची गरज राहणार नाही आणि उपचारही सातत्याने सुरू राहतील. आमची टीम परस्पर समन्वयाने पेशंट-केंद्रित पद्धतीने पुरुष आणि महिलांच्या फर्टिलिटीच्या तपासणीत मदत करण्यासाठी कटिबद्ध आहे, ज्यामध्ये क्लिनिकल तज्ज्ञता आणि आपुलकीने केअर यांचाही समावेश आहे.

या उद्घाटनासोबत इंदिरा आयव्हीएफने आपला राष्ट्रीय विस्तार सुरू ठेवला आहे, हे सेंटर संपूर्ण भारतातील २०० क्लिनिकांच्या नेटवर्कमध्ये जोडले गेले आहे. बाणेर सेंटर पुरुष आणि महिला दोघांच्याही वंधत्वासंबंधी समस्यांसाठी फर्टिलिटी आणि असिस्टेड रिप्रोडक्टिव्ह सर्व्हिसेस देईल, ज्यांना स्टँडर्ड लॅबोरेटरी प्रक्रिया, इलेक्ट्रॉनिक मेडिकल रेकॉर्ड्स आणि पेशंट सेफ्टी सिस्टमचे समर्थन मिळेल.

## सुबोध भावे यांच्या अभिनयाने सजलेली 'पूर्णब्रह्म' प्रेक्षकांच्या पसंतीस



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संतश्रेष्ठ ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या जीवनविचारांवर आधारित 'पूर्णब्रह्म' हा लघुपट प्रेक्षकांच्या भेटीला आला असून, अल्पावधीतच त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अभिनेता सुबोध भावे आणि दिग्दर्शक अथर्व सुदामे यांच्या या कलाकृतीचे समाजमाध्यमांवरही कौतुक होत आहे. अथर्व सुदामे यांच्या अधिकृत यूट्यूब वाहिनीवर प्रदर्शित झालेल्या 'पूर्णब्रह्म'मधून गोंदवलेकर महाराजांचे विचार आणि त्यांचा आध्यात्मिक वारसा नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अध्यात्मासारख्या गहन विषयाची मांडणी संवेदनशील आणि सहज पद्धतीने करण्यात आल्याने हा लघुपट प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे. 'पूर्णब्रह्म'मध्ये सुबोध भावे यांनी संतश्रेष्ठ ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची भूमिका साकारली आहे. त्यांच्या अभिनयातून महाराजांचे व्यक्तिमत्त्व, विचार आणि आध्यात्मिक भावविश्व प्रभावीपणे उलगडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## प्रतिपंढरपूर डाळिंबच्या श्री विठ्ठल बनात भाविकांची मांदियाळी

आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या हस्ते महापूजा; देवस्थानच्या विकासासाठी निधी देण्याची ग्वाही



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

दौंड, हवेली आणि पुरंदर या तीन तालुक्यांच्या सीमेवर 'प्रतिपंढरपूर' म्हणून प्रसिद्ध असलेल्या डाळिंब येथील श्री विठ्ठल बनात आषाढी एकादशीनिमित्त भाविकांची मोठी गर्दी झाली. यावेळी शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या हस्ते श्री विठ्ठलाची महापूजा करण्यात आली.

श्री विठ्ठल बन देवस्थानच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असून मंदिराकडे येणारे रस्ते रुंद आणि दर्जेदार करण्यावर भर दिला जाईल, अशी ग्वाही आमदार कटके यांनी दिली. हवेलीच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणार असल्याचे सांगत त्यांनी जनतेच्या सुख-समृद्धीसाठी पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना केली. माजी आमदार रमेश थोरात यांनी भाविकांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला विभागीय अध्यक्षा वैशाली नागवडे यांनीही मनोगत व्यक्त केले. देवस्थानचे अध्यक्ष राजेंद्र कांचन यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाचे आयुक्त अनिल कवडे यांच्यासह विविध शासकीय अधिकारी, राजकीय पदाधिकारी, ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पहाटेपासून रात्रीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवस्थानचे सचिव एल. बी. म्हस्के यांनी केले, तर उपसरपंच सागर म्हस्के यांनी आभार मानले.

## जेष्ठ साहित्यीक व नामवंत कवयित्री डॉ. निलांबरी गानू यांचे निधन



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

साहित्य क्षेत्रातील एक नामवंत कवयित्री, लेखिका, व अनेक पुरस्काराने सन्मानीत येथील डॉ निलांबरी प्रमोद गानू यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. अंत्यसमयी त्या ६७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती व तीन मुली असा परिवार आहे. मुंबईतल्या मुलुंड उपनगरात जन्मलेल्या नीलांबरी गानू यांचे बालपण मोठ्या आनंदात आणि मोकळ्या वातावरणात गेले. लहानपणापासूनच आजीकडून गोष्टी ऐकण्याची त्यांना आवड होती. आईने केलेले वाचनाचे संस्कार आणि त्यांचे मामा सुप्रसिद्ध लेखक गो. नि. दांडेकर यांच्याकडून आलेले लेखनाचे संस्कार त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. लहानपणापासूनच संत गाडगेबाबा आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कथा वाचून मोठ्या झालेल्या, नीलांबरी यांनी, वयाच्या पन्नाशीनंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर लेखन सुरू केले. अहिल्यादेवींचे कार्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी कादंबरी लेखन केले.". 'शिवयोगिनी' आणि 'गंगाजळ निर्मळ' या त्यांच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना समर्पित कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. तसेच, 'मी अहिल्या बोलतेय' या स्वरचित एकपात्री नाटकाचे काही प्रयोगदेखील त्यांनी केले होते. मात्र, प्रकृती अस्वास्थ्यामुळे पुढे नाटकाचे प्रयोग थांबले. त्यांनी अहिल्यादेवी यांच्यावर लिहिलेल्या साहित्याचा आज इंग्लंडच्या राणीच्या व्यक्तिगत ग्रंथालयात समावेश करण्यात आला असून, त्यांच्या 'शिवयोगिनी' आणि 'गंगाजळ निर्मळ' या कादंबऱ्यांसाठी 'इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ अमेरिका'तर्फे त्यांना 'डॉक्टरेट' प्रदान केली आहे. त्यानंतर नायजेरिया, मलेशिया आणि दक्षिण आफ्रिका या देशातील विद्यापीठांनीदेखील त्यांना 'डॉक्टरेट' प्रदान करून त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव केला होता." कथालेखन, स्तंभलेखन, कादंबरी लेखन, मराठी,हिंदी गुजराती भाषेत कविता, बालनाट्य, भारुड - भलरी लेखन, दिवाळी अंकासाठी लेखन असे विपुल साहित्य त्यांनी लिहिले आहे.

## पुण्यात 'एनव्हिडिया जीफोर्स डे २०२६'ला उत्स्फूर्त प्रतिसाद




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कृत्रिम बुद्धिमत्ता, गेमिंग आणि सर्जनशील तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देणारा 'एनव्हिडिया जीफोर्स डे २०२६' मेस्से ग्लोबल कन्व्हेन्शन सेंटर येथे उत्साहात पार पडला. पुण्यातील प्रमुख अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसह ६ हजारांहून अधिक विद्यार्थी, निर्माते, विकसक आणि गेमिंगप्रेमींनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमात नवीनतम जीफोर्स आरटीएक्स ५० मालिका लॅपटॉप आणि डेस्कटॉप, एआय-संचलित कार्यपद्धती तसेच स्थानिक एआय विकासासाठी 'डीजीएक्स स्पार्क' या वैयक्तिक एआय महासंगणकाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. एनव्हिडिया आणि युबिसॉफ्टतर्फे एआय, गेम डेव्हलपमेंट आणि सर्जनशील तंत्रज्ञानावर विविध कार्यशाळाही घेण्यात आल्या.

## आषाढी एकादशी निमित्त धायरीत भाविकांना खिचडीचे वाटप



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वानिमित्त धायरी येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी खिचडी वाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. सकाळपासून मंदिर परिसरात विठ्ठल नामाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती. या सर्व भाविकांना प्रसादरूपाने गरमागरम खिचडीचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम सामाजिक कार्यकर्ते तुषार श्रीहरी पोकळे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आला. आषाढी एकादशीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन भाविकांना प्रसाद वाटपाच्या माध्यमातून सेवा करण्याचा उद्देश या उपक्रमामागे असल्याचे आयोजकांनी सांगितले. अनेक वारकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांनी या प्रसादाचा लाभ घेतला. यावेळी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी विठ्ठलाचे दर्शन घेतल्यानंतर प्रसाद स्वीकारत पोकळे यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.

## 'यूट्यूब रिपोर्टर' म्हणजे पत्रकार नव्हे

- माध्यम स्वातंत्र्याचा गैरवापराबाबत उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण
- तपासातील त्रुटींवर न्यायालयाची नाराजी

**नागपूर (दै. आरंभ पर्व)**

मोबाईल आणि मायक्रोफोन हातात घेऊन स्वतःला 'रिपोर्टर' म्हणवून घेणे म्हणजे पत्रकारिता नव्हे. प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य लोकशाहीचा महत्त्वाचा आधारस्तंभ असले, तरी ते बेजबाबदार पत्रकारिता, दडपशाही किंवा समाजात तणाव निर्माण करणाऱ्या वर्तनाचे संरक्षण ठरू शकत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत दिल्ली उच्च न्यायालयाने दोन आरोपींना जामीन मंजूर केला. न्यायालयाने माध्यम क्षेत्रासाठी उत्तरदायित्व आणि नैतिक मानके सुनिश्चित करणारी नियामक चौकट उभारण्याची गरजही अधोरेखित केली. न्यायमूर्ती गिरीश कथपालिया यांनी अबिद अली आणि फुरकान यांच्या जामीन अर्जांवर निर्णय देताना ही निरीक्षणे नोंदवली. या दोघांविरुद्ध सीमापुरी पोलिस ठाण्यात २०२५ मध्ये गुन्हा दाखल झाला होता. अनधिकृत बांधकामाचे चित्रीकरण करत असल्याचा दावा करणाऱ्या दोन 'यूट्यूब रिपोर्टर्स'वर जमावाने हल्ला केल्याचा आरोप या प्रकरणात आहे. सुनावणीदरम्यान तपास अधिकाऱ्याने न्यायालयासमोर सादर केलेली माहिती आणि व्हिडीओतील दृश्यांमध्ये विसंगती असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. आरोपींची ओळख, त्यांची भूमिका आणि व्हिडीओतील उपस्थिती याबाबत तपास यंत्रणेची भूमिका सुसंगत नसल्याची नोंद करत न्यायालयाने पोलिसांच्या ढिसाळ तपासावर तीव्र नाराजी व्यक्त केली. जवळपास वर्षभर आरोपी तुरुंगात असूनही खटला सुरू झालेला नसल्याचेही न्यायालयाने नमूद केले. गेल्या काही वर्षांत सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे कोणतीही व्यक्ती मोबाईल व मायक्रोफोन घेऊन स्वतःला 'रिपोर्टर' घोषित करते. अनेकदा अशा व्यक्ती नागरिकांवर तत्काळ प्रतिक्रिया देण्याचा दबाव आणतात, उत्तर न दिल्यास दिशाभूल करणारे कथन करतात किंवा सनसनाटी आणि अप्रमाणित माहिती प्रसारित करतात. अशा प्रकारामुळे सामाजिक तेढ निर्माण होऊ शकते. त्यामुळे माध्यमस्वातंत्र्य अबाधित ठेवतानाच व्यावसायिक उत्तरदायित्व, नैतिकता आणि नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणारी कायदेशीर चौकट उभारण्याची वेळ आल्याचे न्यायालयाने नमूद केले. न्यायालयाने स्पष्ट केले की, प्रत्येक नागरिकाला प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार देण्याचा अधिकार आहे. अशा वेळी संबंधित व्यक्ती कॅमेऱ्यासमोर मौन बाळगल्याचा विपर्यास करून ती प्रश्न टाळत असल्याचा आभास निर्माण करणे योग्य नाही.

# ओएसिस फर्टिलिटीतर्फे पुण्यात 'जननी डायलॉग्स'चे आयोजन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतात बदलती जीवनशैली, करिअरला दिले जाणारे प्राधान्य, आर्थिक नियोजन आणि वाढत्या वयामुळे कुटुंब नियोजनाचे निर्णय अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. या पार्श्वभूमीवर ओएसिस फर्टिलिटीतर्फे पुण्यात 'जननी डायलॉग्स' या सार्वजनिक हिताच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. "द पॅरेंटहुड पॅराडॉक्स: बिल्डिंग अ फॅमिली-फ्रेंडली इंडिया" या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात प्रजनन आरोग्य, पालकत्वाविषयी जागरूकता आणि माहितीपूर्ण कुटुंब नियोजन यावर विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी सखोल चर्चा केली. या कार्यक्रमात वैद्यकीय तज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, मानव संसाधन क्षेत्रातील प्रतिनिधी, सामाजिक संस्था तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले. हैदराबाद येथून आयोजित राष्ट्रीय चर्चेचे थेट प्रक्षेपण पुण्यासह देशातील विविध शहरांमध्ये करण्यात आले. चर्चेदरम्यान भारतातील एकूण प्रजनन दर हा पुनर्स्थापना पातळीपेक्षा खाली आल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. विवाह उशिरा होणे हेच एकमेव कारण नसून, शिक्षण, करिअर, आर्थिक स्थैर्य आणि वैयक्तिक ध्येयांना प्राधान्य देत अनेक जोडपी पालकत्व पुढे ढकलत असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले. मात्र, मानवी प्रजननक्षमतेचे जैविक घड्याळ आपल्या नैसर्गिक गतीनेच चालत असल्याने योग्य वेळी प्रजनन आरोग्याविषयी जागरूकता आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा अत्यंत महत्त्वाची असल्याचे अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमात 'पॅरेंटहुड पॅराडॉक्स' या संकल्पनेवर विशेष भर देण्यात आला. बदलती जीवनशैली आणि अपरिवर्तित जैविक वास्तव यातील वाढत्या अंतरामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांवर चर्चा करण्यात आली. कोणाच्याही वैयक्तिक निर्णयावर प्रभाव टाकणे हा या उपक्रमाचा उद्देश नसून, योग्य माहिती आणि वेळेवर मार्गदर्शनाद्वारे सुजाण निर्णय घेण्यास मदत करणे हेच या कार्यक्रमाचे ध्येय असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

